09-04-2025-Dai-01aaaaa_DH_PAN_01_04_2016-1.qxp 08-04-2025 23:40 Page 1




मोपा गावात घरफोड्यांचे सत्र कायम

» पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



आरसीबीच्या कर्णधाराला १२ लाखांचा दंड

» पान ४ वर

वेर्णा, बुधवार, ९ एप्रिल २०२५ I पाने ४ I ₹ ४

I REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 I Volume 13, Issue 216 I Verna, I facebook.com/dainikherald I Wednesday 9 April 2025 I Pages 4 I ₹ 4

# अनधिकृत बांधकामांबाबत मोठा निर्णय

## कायदेशीर करण्यासाठी वटहुकूमाची तयारी

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. ८ : राज्यातील अनधिकृत बांधकामांना कायदेशीर दर्जा देण्यासाठी गोवा सरकार नवीन वटहुकूम काढण्याचा विचार करत आहे, अशी माहिती मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी दिली. मात्र, रस्त्यालगतच्या बेकायदा बांधकामांवर कारवाई अपरिहार्य असून, ती स्वयंप्रेरणेने हटवावीत, असे आवाहन त्यांनी केले.**

मुख्यमंत्री सावंत यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात महत्त्वपूर्ण उच्चस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीला महसूल मंत्री बाबूश मोन्सेरात, मुख्य सचिव व्ही. कांडावेलू, महसूल विभागाचे वरिष्ठ अधिकारी तसेच अन्य संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. राज्यात बेकायदा बांधकामांना कोणत्याही परिस्थितीत संरक्षण दिले जाणार नाही, तसेच दोन्ही जिल्हाधिकाऱ्यांना कठोर कारवाईचे स्पष्ट आदेश देण्यात आल्याचे मुख्यमंत्री सावंत यांनी सांगितले.

मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर गोवा सरकारने राज्यभरातील अनधिकृत बांधकामांचे सर्वेक्षण हाती घेतले आहे. न्यायालयाच्या निर्देशांचा सन्मान राखत, कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. रस्त्यालगतच्या बेकायदा बांधकामांना नोटिसा बजावण्यात आल्या असून, १५ दिवसांच्या आत ती हटविण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यासाठी प्रत्येक तालुक्यात भरारी पथके स्थापन करण्यात आली असून, मामलेदार, तलाठी आणि अन्य प्रशासनिक अधिकाऱ्यांचा यात समावेश आहे. नागरिक १०० क्रमांकावर तक्रार केल्यास तातडीने कारवाई केली जाईल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

भाजपच्या कोअर कमिटीच्या बैठकीत काही मंत्र्यांनी आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर बेकायदा बांधकामांवरील कारवाईचा संभाव्य परिणाम व्यक्त केला. डिसेंबरमध्ये जिल्हा पंचायत निवडणुका, मार्चमध्ये नगरपालिका निवडणुका आणि २०२७ मध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. अशा परिस्थितीत मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे हटविल्यास सत्ताधारी पक्षाला राजकीय फटका बसू शकतो, अशी चिंता काही आमदारांनी व्यक्त केली.

गोवा सरकारने राज्यभरातील काही अनधिकृत बांधकामांना कायदेशीर दर्जा देण्यासाठी वटहुकूम आणण्याचे ठरविले आहे. बैठकीत संबंधित धोरणाचा आढावा घेण्यात आला. सरकारच्या प्रस्तावित वटहुकुमानुसार, स्वमालकीच्या जमिनीवरील तसेच कोमुनिदाद (स्थानीय समुदाय) जमिनीवरील काही बांधकामांना नियमित करण्याची तरतूद असणार आहे. मात्र, सार्वजनिक वापरासाठी अधिग्रहित जमिनींवरील बेकायदा बांधकामांवर कोणतेही संरक्षण दिले जाणार नाही आणि ती तातडीने हटविण्यात येतील, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री सावंत म्हणाले, या निर्णयामुळे अनेक सामान्य नागरिकांना दिलासा मिळेल आणि त्यांच्या घरांना कायदेशीर मान्यता मिळेल. मात्र, नियमनाच्या निकषांचे उल्लंघन केल्यास कठोर कारवाई करण्यात येईल.

राज्यात अनधिकृत बांधकामे मोठ्या प्रमाणावर वाढत असल्याने उच्च न्यायालयाने याची गंभीर दखल घेतली होती. त्या पार्श्वभूमीवर सरकारने हा निर्णय घेतला असून, भविष्यात बेकायदा बांधकामांना थारा दिला जाणार नाही, असे स्पष्ट संकेत देण्यात आले आहेत. राज्य सरकारकडून लवकरच संबंधित वटहुकूमाची अंमलबजावणी केली जाणार आहे. प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना सर्वेक्षण पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले असून, नागरीकांनी नियमबाह्य बांधकामे हटविण्यास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# बोंडला प्राणीसंग्रहालय तात्पुरते बंद

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ८** : गोव्यातील एकमेव प्राणीसंग्रहालय असलेल्या बोंडला वन्यजीव अभयारण्यात तीन सिव्हेट मांजरी आणि दोन जंगली मांजरींचा संशयित विषाणू संसर्गामुळे मृत्यू झाल्याने, खबरदारीचा उपाय म्हणून प्राणीसंग्रहालय तात्पुरते बंद करण्यात आले आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, हे मृत्यू ६ ते ९ मार्च दरम्यान घडले असले तरी, प्राणीसंग्रहालय परिसर क्वारंटाईन करण्याचा आदेश ३० मार्च रोजी जारी करण्यात आला होता. त्यानुसार, १ एप्रिलपासून पर्यटकांसाठी प्राणीसंग्रहालय बंद ठेवण्यात आले आहे.

केंद्रीय प्राणीसंग्रहालय प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, एकापेक्षा जास्त प्राण्यांचा मृत्यू झाल्यास, प्रतिबंधात्मक उपाय म्हणून किमान १५ दिवसांचा क्वारंटाईन कालावधी आवश्यक असतो. या घटनेबाबत पत्रकारांशी संवाद साधताना वनमंत्री विश्वजित राणे यांनी प्राणीसंग्रहालयाच्या तात्पुरत्या बंदीबाबत त्यांना कोणतीही पूर्वसूचना देण्यात आली नसल्याची माहिती दिली.

संशयास्पद विषाणू संसर्गामुळे पाच प्राण्यांचा मृत्यू झाला, परंतु याबाबत मला कोणतीही माहिती देण्यात आली नाही. यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल. मी अहवाल मागवला असून, यासंदर्भात तातडीने आढावा बैठक बोलावली आहे. बैठकीनंतर मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांना अहवाल सादर केला जाईल, असे राणे म्हणाले.

त्यांनी पुढे सांगितले की, विभागाने अधिक सतर्क राहण्याची गरज आहे. मी वनमंत्री असूनही, माझ्या विभागातील एवढ्या महत्त्वाच्या निर्णयाची माहिती मला दिली गेली नाही, हे पूर्णपणे अस्वीकार्य आहे. मी आजच आढावा बैठक घेऊन परिस्थितीचा तपशीलवार आढावा घेईन.

दरम्यान, मृत झालेल्या प्राण्यांचे नमुने भोपाळ येथील प्रयोगशाळेत पाठवण्यात आले असून, आतापर्यंत कोणत्याही नवीन मृत्यूची नोंद झालेली नाही, अशी माहिती वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

## निवडक

### वक्फ विधेयकाविरोधातील निदर्शनाला हिंसक वळण

**मुर्शिदाबाद, दि. ८** : वक्फ सुधारणा विधेयक नुकतंच संसदेच्या दोन्ही सभागृहात मंजूर करण्यात आलं आहे. या विधेयकावरून सत्ताधारी आणि विरोधी पक्षांमध्ये गेल्या काही दिवसांपासून आरोप प्रत्यारोपाच्या फैरी झडत होत्या. तसेच राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देखील वक्फ सुधारणा विधेयकाला मंजूरी दिली आहे. त्यामुळे आता या विधेयकाचं कायद्यात रूपांतर झालं आहे. मात्र, अद्यापही देशातील विविध ठिकाणी वक्फ सुधारणा विधेयकाच्या विरोधात आंदोलन करत निषेध व्यक्त केला जात आहे. तसेच हे विधेयक मागे घेण्याची मागणी केली जात आहे. आता पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबादमध्ये वक्फ सुधारणा विधेयकावरून हिंसाचार उफाळला आहे. आज मुर्शिदाबादमध्ये वक्फ सुधारणा विधेयकाच्याविरोधात आंदोलन करण्यात आलं होतं. यावेळी आंदोलकांनी सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. मात्र, यानंतर या आंदोलनाला हिंसक वळण लागलं. मुर्शिदाबादमधील अनेक ठिकाणी दगडफेक आणि वाहनांची तोडफोड करण्यात आली. तसेच अनेक ठिकाणी वाहनांची जाळपोळ करत मोठ्या प्रमाणात नुकसान करण्यात आलं. यानंतर मुर्शिदाबादमध्ये मोठा तणाव निर्माण झाला असल्याची माहिती सांगितली जात आहे.

----------------

### ट्रम्प यांची ५०% कर लावण्याची धमकी

**बीजिंग, दि. ८** : अमेरिका आणि चीनमधील टॅरिफवरून व्यापार युद्धाची शक्यता वाढली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोमवारी एका सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटले होते की, जर चीनने अमेरिकेवर लादलेला ३४% कर मागे घेतला नाही तर बुधवारपासून त्यावर अतिरिक्त ५०% कर लादला जाईल.याबाबत चीनने म्हटले आहे की, अमेरिका आपल्यावर लादलेले शुल्क आणखी वाढवण्याची धमकी देऊन एकामागून एक चुका करत आहे. या धमकीवरून अमेरिकेची ब्लॅकमेलिंग वृत्ती उघड होते. चीन हे कधीही स्वीकारणार नाही. जर अमेरिका स्वतःच्या मर्जीनुसार वागण्याचा आग्रह धरत राहिली तर चीनही शेवटपर्यंत लढेल. रविवारी, चीनने जगाला एक स्पष्ट संदेश दिला – 'जर व्यापार युद्ध झाले तर चीन पूर्णपणे तयार आहे – आणि त्यातून आणखी मजबूतपणे बाहेर पडेल.

----------------

### जम्मू-काश्मीर विधानसभेत गोंधळ

**श्रीनगर, दि. ८** : जम्मू आणि काश्मीर विधानसभेत मंगळवारी सलग दुसऱ्या दिवशी नवीन वक्फ कायद्यावरून गदारोळ झाला. नॅशनल कॉन्फरन्सच्या आमदारांनी विधेयकावर चर्चा करण्याची मागणी करत सभागृहात घोषणाबाजी केली. यावेळी, एनसी आणि भाजप आमदारांमध्ये धक्काबुक्की झाली.

सोमवारी, एका एनसी आमदाराने सभागृहात वक्फ कायद्याची प्रत फाडली. एका एनसी आमदाराने त्यांचे जॅकेट फाडले आणि ते सभागृहात हलवले. यानंतर सभापतींनी सभागृहाचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब केले. एनसीसह इतर पक्षांनी वक्फ कायद्याविरुद्ध ठराव आणण्याबाबत चर्चा केली होती. वक्फ दुरुस्ती विधेयक (आता कायदा) २ एप्रिल रोजी लोकसभेत आणि ३ एप्रिल रोजी राज्यसभेत मंजूर झाले. ५ एप्रिल रोजी उशिरा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी या विधेयकाला मान्यता दिली. सरकारने नवीन कायद्याबाबत राजपत्र अधिसूचना जारी केली आहे. आता केंद्र सरकार कायदा लागू करण्यासाठी अधिसूचना जारी करेल.

### हवामान

कमाल : २८ किमान : २३

आर्द्रता : ७५

### बाजार भाव

सोने : ₹ ७१,७८० (१० ग्रॅम)

चांदी : ₹ ८५,१०० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ८२,३६५ .७७↑ (२३१.१६ )

निफ्टी : २५,२३५.९० ↑ (८३.९५)

# कंपाल मच्छिमारांसाठी रॅम्प आणि पार्किंग सुविधेची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ८** : पणजी शहर महानगरपालिकेचे महापौर रोहित मोन्सेरात यांच्यावर कंपाल येथील मच्छिमारांचे पारंपारिक हक्क नाकारल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. तसेच, त्वरित रॅम्प आणि पार्किंग सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

पणजी ब्लॉक काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षा प्रतिभा बोरकर यांनी जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गोवा राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ आणि पणजी महापालिका यांच्या असंवेदनशील आणि अदूरदर्शी विकास प्रकल्पांमुळे कंपाल समुद्रकिनाऱ्यावर उपजीविका करणाऱ्या ३० हून अधिक पारंपरिक मच्छिमार कुटुंबांचे जीवनमान धोक्यात आले आहे.

बोरकर यांनी स्पष्ट केले की, पिढ्यानपिढ्या मच्छिमार आपल्या लहान होड्या कंपाल किनाऱ्यावर नांगरतात आणि तेथेच आपली जाळी साठवतात. ही परंपरा पणजीच्या सांस्कृतिक आणि आर्थिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे.

परंतु, स्मार्ट सिटी आणि शहरी सौंदर्यीकरणाच्या नावाखाली मच्छिमारांचे हक्क अक्षरशः बुलडोझरने नष्ट केले जात आहेत,असे बोरकर म्हणाल्या. त्यांनी पुढे नमूद केले की, मिरामारला जोडण्यासाठी उभारण्यात आलेल्या संरक्षक भिंतीमुळे शहराचा विकास झाला असला, तरी याच शहराचा आधार असलेल्या मच्छिमारांवर मात्र त्याचा विपरीत परिणाम झाला आहे.

बोरकर यांनी सांगितले की, गोवा राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ आणि इतर अधिकाऱ्यांनी वारंवार मच्छिमारांसाठी समर्पित रॅम्प आणि डॉकिंग क्षेत्र उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, प्रत्यक्षात काहीच झालेले नाही. उलट, त्यांची पारंपारिक पार्किंग जागा अतिक्रमित केली जात आहे.

त्यांनी आरोप केला की, आता तर एंटरटेनमेंट सोसायटी ऑफ गोवा समोरील योग सेतूजवळील तात्पुरती जागादेखील महापालिका आणि वन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या इशाऱ्यावर हिसकावली जात आहे.

हे केवळ प्रशासनाचे अपयश नाही, तर गोव्याच्या पारंपरिक वारशावर आणि मच्छिमारांच्या उपजीविकेवर थेट हल्ला आहे,असे बोरकर यांनी ठामपणे सांगितले.

काँग्रेसने प्रशासनाकडे ज्या मागण्या केल्या आहेत, त्यामध्ये, मच्छिमारांना पारंपरिक जागांमधून हटवण्याची प्रक्रिया तातडीने थांबवावी, कंपाल समुद्रकिनाऱ्यावर त्यांच्या सल्लयानुसार समर्पित, सुरक्षित रॅम्प आणि पार्किंग सुविधा उभारावी तसेच योग सेतूजवळील तात्पुरत्या क्षेत्रात मच्छिमारांना पूर्ववत प्रवेश द्यावा, जोपर्यंत कायमस्वरूपी सुविधा उभारल्या जात नाहीत. या मागण्यांचा समावेश आहे. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणावर प्रतिक्रिया देताना महापौर रोहित मोन्सेरात यांनी स्पष्ट केले की, हा विषय वन विभाग आणि स्मार्ट सिटी अधिकाऱ्यांशी संबंधित असून, तो महापालिकेच्या अधिकारक्षेत्रात येत नाही. तसेच, संबंधित विभागांकडे पुढील कारवाईसाठी निवेदन पाठवले जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

# मुरगाव बंदर खाजगीकरणाच्या विरोधात निदर्शने

■ टीम दैनिक हेराल्ड

**वास्को, दि. ८** : मुरगाव पोर्ट अथॉरिटीच्या गेटबाहेर मंगळवारी स्टीव्हडोर्स आणि पोर्ट स्टेकहोल्डर असोसिएशनच्या सदस्यांनी बर्थ क्रमांक १० आणि ११ च्या खाजगीकरणाविरोधात निदर्शने केली. या निर्णयामुळे शेकडो स्थानिक कुटुंबांचे जीवनमान धोक्यात येणार असल्याची चिंता आंदोलकांनी व्यक्त केली.

यावेळी माध्यमांशी संवाद साधताना आंदोलकांनी स्पष्ट केले की, एमपीए ने घेतलेल्या या निर्णयामुळे अनेक स्थानिक बेरोजगार होतील. स्थानिक कामगारांसाठी केवळ दोनच बर्थ शिल्लक राहिल्या असताना, आमच्या आक्षेपांकडे दुर्लक्ष करून एमपीएने त्यांचे खाजगीकरण केले आहे, असे आंदोलकांनी सांगितले.स्टीव्हडोर्स आणि पोर्ट स्टेकहोल्डर असोसिएशनच्या शिष्टमंडळाने सोमवारी मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांना निवेदन सादर केले.

पान २ ▶

# चोपडे झोनिंग सुधारणा रद्द

## ब्रह्म ॲग्रो टेरा प्रोजेक्ट्स अतिरिक्त शुल्क भरण्यात अपयशी

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ८** : ब्रह्म ॲग्रो टेरा प्रोजेक्ट्स लिमिटेडला ७.१६ कोटी रुपयांचे अतिरिक्त शुल्क भरण्यात अपयश आल्याने, पेडणे तालुक्यातील चोपडे येथील झोनिंग सुधारणा रद्द करण्यात आली आहे. ही रद्द करण्यात आलेली अधिसूचना ४ एप्रिल २०२५ रोजी जारी करण्यात आली असून, ती मंगळवारी मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठात सादर करण्यात आली.

गोवा सरकारने १६ मार्च २०२३ रोजीच्या अधिसूचनेनुसार जमिनीचे मूल्यांकन केले होते आणि ब्रह्म ॲग्रो टेरा प्रोजेक्ट्सकडून १.७९ कोटी रुपये शुल्क वसूल करण्यात आले. मात्र, २८ मार्च २०२४ रोजी सरकारने सुधारित दर लागू केले, त्यामुळे अतिरिक्त शुल्क भरण्याची आवश्यकता निर्माण झाली.

टीसीपी विभागाने २६ फेब्रुवारी २०२५ रोजी नव्या दरांनुसार ७.१६ कोटी रुपये भरण्याचा आदेश कंपनीला दिला होता. मात्र, कंपनीने हे शुल्क भरण्यास विलंब केल्याने, ७ मार्च २०२५ रोजी झालेल्या टीसीपी बोर्डाच्या बैठकीत चोपडे येथील ८९,००० चौरस मीटर जमिनीचे झोनिंग रूपांतरण रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला.

न्यायालयीन सुनावणीदरम्यान, टीसीपीच्या वकिलांनी माहिती दिली की २२ व्यक्तींनी सुधारित दरानुसार शुल्क भरले आहे, तर १४ जणांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. शुल्क न भरल्यास त्यांचे झोनिंग परवानेही रद्द करण्यात येतील.

दरम्यान, दक्षता संचालनालयाने न्यायालयाला सीलबंद लिफाफ्यात सादर केलेल्या अहवालात ४६ प्रकरणांच्या चौकशीबाबत माहिती दिली. न्यायालयाने निरीक्षण नोंदवले की, या व्यवहारांमुळे सरकारी तिजोरीला मोठे नुकसान झाले आहे. तसेच, कमी मूल्यांकनाशी संबंधित आणखी ५० प्रकरणे चौकशीसाठी संचालनालयाकडे पाठवण्यात आल्याची माहितीही न्यायालयाला देण्यात आली.

याचिकाकर्त्यांचे वकील ॲड. रोहित ब्रास डीसा यांनी असा युक्तिवाद केला की, महसूल वसुलीच्या उद्देशाने मालमत्तांचे कमी मूल्यांकन करणाऱ्या अधिकाऱ्यांना जबाबदार धरले पाहिजे. तसेच, टीसीपी विभागाने जारी केलेले रूपांतरण सनदही रद्द करावी, अशी मागणी त्यांनी केली. याशिवाय, त्यांनी असा आरोप केला की, टीसीपी मंत्र्यांनी स्वतःसाठी कलम १७ (२) अंतर्गत सूट घेतली असून, त्यांना शुल्क लागू नाही असे सांगण्यात आले आहे. यावर न्यायालयाने सांगितले की, प्रतिवादींकडून उत्तर प्राप्त झाल्यानंतर या सर्व मुद्द्यांची चौकशी केली जाईल.

या प्रकरणामुळे झोनिंग बदल आणि सरकारी महसूल धोरणावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सरकार आणि संबंधित विभाग यावर काय भूमिका घेतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# ना रस्ता ना पूलः ग्रामस्थांचे हाल संपणार कधी ?

गौरेश सत्तरकर

■ टीम दैनिक हेराल्ड

**सांगे, दि. ८** : राज्य सरकार विविध भागांना जोडणाऱ्या पूल आणि महामार्गांच्या विकासाचा दावा करत असताना, कावरे पिर्ला ग्रामपंचायतीअंतर्गत येणाऱ्या बांकाळ आणि काजूर येथील नागरिक मात्र गेल्या अनेक वर्षांपासून एका मूलभूत सुविधेसाठी संघर्ष करत आहेत. या गावांना मुख्य रस्त्याशी जोडणारा पूल अद्यापही बांधण्यात आलेला नाही. परिणामी, येथील रहिवाशांना वाहतुकीसाठी गंभीर अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः पावसाळ्यात हा प्रश्न अधिक गंभीर होतो.



गावातील सुमारे १०० घरांना या पुलाच्या अभावाचा फटका बसत आहे. वर्षातील बहुतांश काळ नागरिक नदी ओलांडत असले तरी, पावसाळ्यात पाणीपातळी वाढल्याने त्यांना तो मार्गही बंद करावा लागतो. त्यामुळे प्रत्येक वर्षी गावकरी लाकडाच्या साहाय्याने तात्पुरता पूल उभारतात. मात्र, हा उपाय केवळ काही काळापुरताच टिकतो.

गावकऱ्यांचे म्हणणे आहे की, शिक्षण, रोजगार आणि दैनंदिन जीवनासाठी त्यांना गावाबाहेर जावे लागते. मात्र, पूल नसल्याने ते अडचणीत सापडतात. सरकार शेतीला चालना देण्याचे आश्वासन देते, पण जर मूलभूत सुविधा नसतील, तर शेती कोण करणार? असा सवाल गावकरी उपस्थित करत आहेत. गेल्या काही वर्षांत अनेक आमदार बदलले, मात्र या समस्येचे निराकरण करण्यासाठी कोणतीही ठोस पावले उचलली गेली नाहीत. अनेक वेळा निवेदन देऊनही प्रशासनाकडून प्रतिसाद मिळालेला नाही, अशी ग्रामस्थांची तक्रार आहे.

हेराल्ड मिडियाशी बोलताना गावातील रहिवासी दिलखुश गावकर म्हणाले, मी नोकरीसाठी बाहेर जातो. पूल असल्यास माझ्यासाठी खूप सोयीचे होईल. पाऊस सुरू झाल्यावर नदी ओलांडणे अशक्य होते. दुसरे रहिवासी नरेंद्र गावकर यांनी सांगितले, वाहने बाहेर काढणेही शक्य नाही. पावसाळ्यात वाहतूक ठप्प होते. आमदारांना वारंवार विनंती करूनही आजवर कोणतीही कारवाई झालेली नाही. ओवल गावकर यांनीही या समस्येवर प्रकाश टाकत सांगितले की, गावात एखादी आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास रुग्णवाहिका येऊ शकत नाही. त्यामुळे आरोग्य सेवेचाही मोठा प्रश्न निर्माण होतो.

ग्रामस्थांनी सरकारकडे त्वरित पूल उभारणीसाठी आवश्यक पावले उचलण्याची मागणी केली आहे. राज्याच्या अन्य भागांमध्ये मोठमोठे पूल आणि महामार्ग उभारले जात असताना, बांकाळ-काजूरच्या नागरिकांनी अजूनही मूलभूत सुविधेसाठी संघर्ष का करावा लागतो? असा सवाल करत ते आपल्या हक्कांसाठी लढण्यास तयार आहेत.



